आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१५ नोव्हेंबर २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- जातनिहाय जनगणनेबाबत भूमिका स्पष्ट करण्याचं काँग्रेसचं भाजपाला आव्हान, सत्तेत आल्यावर काँग्रेस आरक्षण हटवणार असल्याचा प्रधानमंत्र्यांचा आरोप फेटाळला

- सोयाबीनला ७ हजार रुपये भाव देण्याचं काँग्रेसचं आश्वासन, सोयाबीनसाठी भावांतर योजना लागू करण्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

- महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा जाहीरनामा राज ठाकरे यांच्याकडून प्रसिद्ध

**आणि**

- भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या टी ट्वेन्टी क्रिकेट मालिकेतला चौथा सामना आज रात्री

**<><><><><>**

जातनिहाय जनगणनेबाबत भाजपा आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोंदी यांनी त्यांची भूमिका जाहीर करावी, असं आव्हान काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी दिलं आहे. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बाेलत होते. काँग्रेस अनुसूचित जाती- जमातींचं आरक्षण संपवणार असल्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा आरोप त्यांनी फेटाळून लावला. काँग्रेसनंच आरक्षण देऊन मागास जातींना हक्क आणि अधिकार दिले, याउलट आरक्षण आणि संविधान संपवण्याचे प्रयत्न भाजपा करत आहे. जातनिहाय जनगणनेला भाजपाचा विरोध आहे, त्यामुळेच प्रधानमंत्री आरक्षण संपवण्याचा खोटा आरोप काँग्रेसवर करत आहेत, असं ते म्हणाले.

महाविकास आघाडीचं सरकार सत्तेत आल्यावर सोयाबीन शेतकऱ्यांना ७ हजार रुपये भाव देईल, याचा पुनरुच्चार विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज केला.

**होल्ड - विजय वडेट्टीवार**

**<><><><><>**

राज्यात एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारने उत्तम काम केलं असून विरोधक महाराष्ट्राला पिछाडीवर नेण्याचं काम करत असल्याची टीका भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी आज केलं. ठाण्यात आज झालेल्या प्रचारसभेत ते बोलत होते. भाजपा सबका साथ, सबका विकास करताना देशातल्या गरीब घटकाची प्रगती करणार असल्याचं आश्वासन नड्डा यांनी या सभेत दिलं.

**<><><><><>**

राज्यात ज्यांच्याकडे सत्ता आहे त्यांचा अनुभव चांगला नसल्यानं सत्तेत बदल करण्याशिवाय पर्याय नाही, असं ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी म्हटलं आहे. ते आज कोल्हापूर जिल्ह्यात इचलकरंजी इथं आयोजित प्रचारसभेत बोलत होते. सत्ता बदलण्यासाठी महाविकास आघाडीचे उमेदवार विजयी करा, असं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

राज्यातलं महायुतीचं सरकार गरजू जनतेला समर्पित आहे, ते पुन्हा सत्तेत आणा, असं आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. ते आज हिंगोली इथं आयोजित प्रचार सभेत बोलत होते. जनतेला घरं, स्वच्छतागृहं, पिण्याचं पाणी, धान्य, मोफत गॅस सिलेंडर, मोफत औषधोपचार अशा विविध व्यवस्था हे सरकार देत आहे, असं ते म्हणाले.

काश्मीरमधे ३७० कलम पुन्हा लागू करण्याचं आश्वासन काँग्रेस देत आहे, पण त्यांना हे कदापी शक्य होणार नाही, अशी टीका शहा यांनी केली. उद्धव ठाकरे यांच्यावरही त्यांनी टीका केली. हिंदुत्वाला पाखंड म्हणणाऱ्यांना उद्धव ठाकरे साथ देत आहेत, त्यांना त्यांची जागा दाखवा, असं आवाहन त्यांनी केलं.

महायुती सरकार राज्याचा गौरव पुन्हा आणून देईल, असं आश्वासन त्यांनी चंद्रपूरमधल्या सभेत दिलं.

**होल्ड - अमित शहा बाइट**

**<><><><><>**

सोयाबीन खरेदी करताना किमान आधारभूत किंमतीतली तफावत दूर करण्यासाठी भावांतर योजना लागू करण्याचं आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिलं. नांदेडमधल्या प्रचारसभेत ते बोलत होते. सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नसल्याची ग्वाही त्यांनी दिली. यावेळी त्यांनी महायुतीच्या आश्वासनांची आठवण उपस्थितांना करुन दिली.

दरम्यान, कांद्याची बेकायदा साठवणूक करणाऱ्या कांदा व्यापाऱ्यांवर संबंधित अधिनियमांनुसार कठोर कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी अन्न आणि नागरी पुरवठा तसंच पणन विभागाला दिले आहेत. कांद्याची साठेबाजी निदर्शनाला आली, तर नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयातल्या पुरवठा विभागाला माहिती द्यावी, असं आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केलं आहे.

**<><><><><>**

गेल्या पाच वर्षामध्ये NRC, मॉब लिंचिंग, कायदा सुव्यवस्था या प्रश्नांवर काँग्रेसनं काहीही भूमिका घेतली नाही, असा आरोप वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष

डॉ. प्रकाश आंबेडकर यांनी आज केला. या सगळ्या प्रश्नांवर आपल्या पक्षाने भूमिका घेतली, असं ते अमरावतीत नांदगावमध्ये झालेल्या प्रचारसभेत म्हणाले.

**<><><><><>**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपा मताधिकाराला 'व्होट जिहाद' म्हणत दोन धर्मात तेढ निर्माण करत असून हे अयोग्य असल्याचा आरोप एमआयएमचे नेते खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी केला आहे.

सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघात जाहीर सभेत ते बोलत होते.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज सातारा जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पक्षाचा जाहीरनामा आज प्रकाशित केला. जाहिरनाम्याच्या पहिल्या भागात मूलभूत गरजा, दुसऱ्या भागात दळणवळण, वीज, पाणी नियोजन, घनकचरा व्यवस्थापन, पर्यावरण जैवविविधता यांचा समावेश करण्यात आला आहे. तिसऱ्या भागात प्रगतीच्या संधी आणि राज्याचं कृषी धोरण आणि चौथ्या भागात **मराठी अस्मिता** हा विषय घेण्यात आल्याचं राज ठाकरे यांनी यावेळी सांगितलं. जाहीरनामा प्रसिद्ध करताना अनेकांनी आम्ही काय करू इतकच दिलं आहे. पण, आमच्या जाहीरनाम्यामध्ये आम्ही काय करू आणि कसं करू या गोष्टी देखील

समाविष्ट केल्या आहेत, असंही ते यावेळी म्हणाले. महाराष्ट्रात चौकाचौकात छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळे आहेत. मग त्यांच्या मंदिरांची गरज काय? त्याऐवजी राज्यातल्या मुलांना शिक्षण मिळणं महत्त्वाचे आहे आणि शिवरायांनी उभारलेले गडकिल्ले चांगले होणं महत्त्वाचं आहे, असं राज ठाकरे यावेळी म्हणाले.

गेल्या १९ वर्षात आम्ही काय केलं यावरची पुस्तिकाही त्यांनी आज प्रसिद्ध केली. येत्या रविवारी मुंबईतल्या शिवाजी पार्क मैदानावर मनसेच्या सभेसाठी अद्याप परवानगी मिळालेली नाही. वेळ अपुरा असल्यानं ही सभा न घेता मतदार संघांना भेटी दिल्या जातील, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

**<><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वेतर्फे मतदारांच्या सोयीसाठी विशेष उपनगरी गाड्या चालवल्या जाणार आहेत. या विशेष गाड्या १९ ते २१ या कालावधीसाठी मध्य रेल्वे मार्गावर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कल्याण आणि हार्बर रेल्वे मार्गावरून सीएसएमटी ते पनवेल असा प्रवास करतील. मतदानाच्या दिवशी मुंबईत दिव्यांग मतदारांसाठी विशेष मोफत बस सेवाही दिली जाणार आहे.

**<><><><>**

मासेमारी करणाऱ्या व्यावसायिकांमध्ये मतदानाबद्दल जनजागृती करण्यासाठी रत्नागिरीतल्या मिरकरवाडा बंदराजवळ आज समुद्रात बोट रॅली काढण्यात आली. त्यात दीडशे होड्यांनी सहभाग घेतला.

**<><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी येत्या २० नोव्हेंबरला मतदान होणार असल्याने पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गुलटेकडी मार्केट यार्डातले बाजार बंद राहणार आहेत.

<><><><><>

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या टी ट्वेन्टी क्रिकेट मालिकेतला चौथा आणि शेवटचा सामना आज रात्री होणार आहे. जोहान्सबर्गच्या वांडरर्स स्टेडियमवर रात्री साडे आठ वाजता सुरू होईल. चार सामन्यांच्या या मालिकेत भारत २-१ ने आघाडीवर आहे.

<><><><><>

अहिल्यानगर आणि नाशिक या दोन जिल्ह्यातल्या नागरिकांच्या सिंचनाची आणि पिण्याच्या पाण्याची सोय निळवंडे प्रकल्पातून झाली आहे. आगामी काळात अकोले तालुक्याचा पर्यटनाच्या दृष्टिकोनातून विकास होईल. आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांचे स्मारक लवकरच उभारण्यात येईल असे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. अहिल्यानगरमध्ये प्रचार सभेत ते बोलत होते.

<><><><><>

कोकणात काही ठिकाणी आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी काल आणि आज पाऊस पडला. मेघगर्जनेसह आलेल्या अवकाळी पावसानं सिंधुदुर्ग जिल्हयाच्या काही भागाला आजही झोडपून काढलं. काही ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाला होता. या पावसामुळे भातशेतीचं नुकसान झालं आहे. साताऱ्यासह जिल्ह्याच्या विविध भागात मेघगर्जनेसह जोरदार पावसाने आज हजेरी लावली.

उद्यापर्यंत कोकणात आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. याच काळात मराठवाड्यात आणि विदर्भात हवामान कोरडं राहील असा अंदाज आहे.

**//<><><><><>//**